# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.२९ नोव्हेंबर, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६८ वी बैठक शनिवार, दि.२९ नोव्हेंबर, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ३) | डॉ. घुटे व्ही. बी. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ६) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ७) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ९) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| १०) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| १२) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १३) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १४) | सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १५) | श्री. पाटील बी. पी. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १६) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १७) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

अधिसभेने विद्यापीठाच्या विभागप्रमुखामधून व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशित केलेले डॉ. व्ही. बी. घुटे यांची व्यवस्थापन परिषदेची दि.२९/११/२०१४ रोजीची पहिलीच बैठक असल्याने व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा. कुलगुरुमहोदयांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

**अनुपस्थितीः**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. यांनी एस. एम. एस. द्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी, विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण), सोलापूर विभाग हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ]

- दि.१८/१०/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत झालेल्या ठरावावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.
- दि.०३ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यवाही अहवालाची नोंद घेणे

ठरावः

- दि.१८/१०/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत झालेल्या ठरावावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.
- दि.०३ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे दुरुस्तीसह वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.
  अ) पान क्र.२६ वरील डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी. यांच्या प्रश्न क्र.३ च्या उत्तरामध्ये "मा. डॉ. शाम तोडकरी (सदस्य) संगमेश्वर कॉलेज, सोलापूर" ऐवजी "मा. श्री. शाम तोडकरी (सदस्य) संगमेश्वर कॉलेज, सोलापूर" अशी दुरुस्ती करण्यात आली.
  ब) पान क्र.२६ वरील श्री. चौगुले एस. एस. यांच्या प्रश्न क्र.३ च्या उत्तरामध्ये "पीएच. डी. नियमावली तयार केली आहे" ऐवजी " नंतर ही नियमावली तयार केली आहे" अशी दुरुस्ती करण्यात आली.

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी (Verification) करीत असताना गुणांच्या बेरजेमध्ये असलेली दुरुस्ती विद्यापीठ संकूलातील प्राध्यापकाकडून करुन घेण्याबाबत व त्याकरीता रु.५/- याप्रमाणे मानधन देण्याची मा. परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः या अनुषंगाने नमूद करण्यात येते की विद्यार्थी हे गुणपडताळणीसाठी अर्ज करीत असतात या अर्जाच्या अनुषंगाने उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करीता असताना विद्यापीठ परीक्षा विभागाच्या असे निदर्शनास येते की, परीक्षकांनी विद्यार्थ्यास उत्तरपत्रिकेच्या आत देण्यात आलेल्या गुण मुखपृष्ठावर नमूद करताना राहून जातात. त्यामुळे अशा प्रकरण दुरुस्ती करीता ज्या परीक्षकांनी उत्तरपत्रिका तपासली आहे त्यांना विद्यापीठ कार्यालयास स्वःखर्चाने बोलावून घेवून सदरची दुरुस्ती करावी लागते. या प्रक्रियेसाठी बराच कालावधी लागतो व विद्यार्थ्यांना दुरुस्ती निकाल कळविण्यास विलंब होतो. वरील बाबी विचारात घेता सदरचा विषय मा. परीक्षा मंडळाच्या दि.२९ ऑक्टोंबर, २०१४ च्या बैठकीतील ठराव क्र. १७ अन्वये उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी [Verification] करीत असताना गुणांच्या बेरजेमध्ये असलेली दुरुस्ती विद्यापीठ संकूलातील प्राध्यापककडून करुन घेण्यात यावी व त्याकरीता रू.५/- याप्रमाणे मानधन देण्यात यावे अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आलेली आहे.

सबब, उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी [Verification] करीत असताना गुणांच्या बेरजेमध्ये असलेली दुरुस्ती करण्याकरीता विद्यापीठ संकुलातील प्राध्यापकाकडून व त्याकरीता रू.५/- याप्रमाणे मानधन देण्याची मा. परीक्षा मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठरावः उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी (Verification) करीत असताना गुणांच्या बेरजेमध्ये असलेली दुरुस्ती विद्यापीठ संकूलातील प्राध्यापकाकडून करुन घेण्याबाबत व त्याकरीता प्रति उत्तरपत्रिका रु.५/- याप्रमाणे मानधन देण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] पदव्युत्तर अध्यापकास व पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळणेबाबतचा सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचे शुल्क सुधारीत करणेची बाब व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः प्रस्तुत विद्यापीठाचा पदव्युत्तर अध्यापकास व पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळणेबाबतच्या अर्जाची सद्यस्थितीत किंमत २००/- रुपये असून, त्यामध्येच मान्यता प्रक्रिया शुल्काचा समावेश आहे, मान्यता देणेसाठी वेगळे शुल्क आकारली जात नाही. सदर अर्जांची किंमत ही प्रस्तुत विद्यापीठ स्थापनेपूर्वी (२००४ पूर्वी) शिवाजी विद्यापीठाने २००/- रुपये ठरविलेली असून, तीच किंमत प्रस्तुत विद्यापीठाने आजतागायत कायम ठेवली आहे.

सबब, सदर फॉर्मच्या किमतीमध्ये कालानुरुप दर पाच वर्षांनी वाढ होणे गरजेचे असल्यामुळे सदर फॉर्मचे शुल्क २००/- रुपये ऐवजी ५००/- रुपये (Including Processing Fee) करणेसाठी सदरचा विषय व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ).

**ठरावः पदव्युत्तर अध्यापकास व पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळण्याबाबतच्या अर्जाचे शुल्क दि.०१ जानेवारी, २०१५ पासून रु.२००/- वरुन रु.५००/- याप्रमाणे (Including Processing Fee) सुधारीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] दि.२९/०४/२०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.१५ अन्वये परीक्षा विभागास आवश्यक असणारे DATA CENTER भाडेतत्वावर घेण्यासाठी सहा महिन्याकरिता मुदतवाढ देण्यात आली होती. सदर DATA CENTER भाडेतत्वावर घेण्यासाठी आणखीन सहा महिने मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता परीक्षा विभागास आवश्यक असणारे DATA CENTER व्यवस्थापन परिषदेच्या विषय व ठराव क्र.१७ च्या मान्यतेस अनुसरुन M/S. Grace Works Information Systems Mumbai या फर्मसोबत करारनामा करुन रु.४०,००/- प्रतिमहिना तसेच DATA CENTER साठी लागणाऱ्या सर्व सुविधा व २ Core ऐवजी ४ Core आणि ८ GB RAM सह भाडेतत्वावर घेण्यात आले होते. सदर करारनामाची मुदत २२/११/२०१३ रोजी संपलेली आहे.

विभागाकडील कामाकरिता सदर DATA CENTER ची आणखी आवश्यकता असल्याने सदरची सेवेची मुदतवाढ घेण्यासाठी आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास दि.२९/१०/२०१३ रोजीच्या टिपणीद्वारे मान्यता घेण्यात आली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने वरील कामासाठी मुदतवाढ व त्यायोगे होणाऱ्या खर्चाचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवला असता दि.३०/१०/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने विषय क्र.६(२) नुसार मान्यता दिलेली होती. सदर मान्यतेस अनुसरुन M/S. Gracework Information Systems Mumbai या फर्मला संदर्भ क्र.सोविसो/परीक्षा/१४०२/दि.२०/११/२०१३ नुसार सदर फर्मला दि.२२/११/२०१३ ते दि.२१/०५/२०१४ अशी सहा महिने मुदतवाढीने कामाचे आदेश देण्यात आले होते.

दि.२१/०५/२०१४ सदरची मुदत संपणार असल्याने आणि विभागास DATA CENTER ची आणखी गरज असल्याने दि.०४/०४/२०१४ रोजीच्या मान्यतेस अनुसरुन सदर कामासाठी पुन्हा सहा महिने मुदतवाढ व त्यासाठी होणाऱ्या खर्चाचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवला असता दि.२९/०४/२०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने विषय क्र.१५ नुसार मान्यता दिलेली होती. सदर मान्यतेस अनुसरुन वरील फर्मला संदर्भ क्र.सोविसो/परीक्षा/२९९/१७५६, दि.१६/०५/२०१४ भाडेतत्वावर घेण्यासाठी मुदतवाढ कामाचे आदेश दिलेले होते.

सदर फर्मला दिलेल्या कामाच्या आदेशाची मुदत दि.२१/११/२०१४ रोजी संपणार आहे.
सबब, विभागाकडील कामाकरिता DATA CENTER ची सेवा भाडेतत्वावर घेण्यासाठी आणखी सहा महिने मुदतवाढ घेणे गरजेचे आहे. सदर कामासाठी रु.२,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदर कामासाठी होणारा खर्च विभागाकडील खालील अंदाजपत्रकीय शिर्षकातून खर्ची टाकावा लागणार आहे.

| Budget Head | Data Center Rent |
|---|---|
| Provision | ५,००,०००/- |
| Expenditure | २,५७,७२०/- |
| Balance | २,४२,२८०/- |

उपरोक्त फर्मकडून DATA CENTER भाडेतत्वावर घेण्यासाठी सहा महिन्याची मुदतवाढ घेण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: दि.२९/०४/२०१४ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार M/S. Grace Works Information Systems Mumbai या फर्मकडून सहा महिन्यासाठी भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या DATA CENTER च्या कराराची मुदत दि.२२/११/२०१४ पासून पुढील सहा महिन्यासाठी त्याच अटी व शर्तीवर वाढविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठान शंकरनगर-धवलनगर, अकलूज, ता. माळशिरस संचलित विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१५-१६ पासून सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते असा बदल करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: मा. मॅनेजिंग ट्रस्टी, सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठान शंकरनगर-धवलनगर, अकलूज, ता. माळशिरस यांच्याकडून संचलित संस्थेचे संचलित विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१५-१६ पासून खालीलप्रमाणे बदल करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेलाआहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे सद्यःस्थितीतील नाव | महाविद्यालयाच्या नावातील बदल |
|---|---|---|
| सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठान शंकरनगर-धवलनगर, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर | विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते | **सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते** |

मा. सचिव, सहकार महर्षि शंकरनगर-अकलूज यांनी प्रस्तूत अर्जासोबत संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या दि.०४/०६/२०१४ रोजीच्या बैठकीतील महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबतदचा ठराव क्र.०३ ची खरी नक्कल जोडली आहे. प्राप्त प्रस्तावात प्रतिष्ठानचेच नाव महाविद्यालयास द्यावे असा ठराव मा. ट्रस्टी यांनी सर्वानुमते घेतला व तसा ठराव मंजूर केला असल्याचे नमूद केले असून महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१५-१६ पासून उक्तप्रमाणे बदल करुन मिळण्याविषयी विनंती केलेली आहे.

महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याच्या प्राप्त प्रस्तावास प्रथमतः महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

परंतु प्रस्तुत विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाच्या बैठकांच्या शै.वर्ष २०१४-१५ च्या नियोजित वेळापत्रकानुसार महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाची बैठक दि.१०/१२/२०१४ रोजी आयोजित केलेली असल्याने विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते या महाविद्यालयाच्या नावात बदलाच्या प्रस्तावास मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कदम १४(७) अन्वये महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठान शंकरनगर-धवलनगर, अकलूज, ता. माळशिरस संचलित विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१५-१६ पासून सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते असा बदल करण्याची बाब विचारार्थ).

ठरावः **सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठान शंकरनगर-धवलनगर, अकलूज, ता. माळशिरस संचलित "विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते" या महाविद्यालयाच्या नावात शै.वर्ष २०१५-१६ पासून "सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते" असा बदल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**या अनुषंगाने झालेल्या चर्चेच्या वेळी याबाबतच्या नियमावलीमध्ये दुरुस्ती करण्याचा विषय पुढील बैठकीसमोर सादर करावा असे ठरले.**

**[ ०७ ] विद्यापीठ परिसरातील विविध बांधकाम करणे या कामाकरिता दि.१३/११/२०१४ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव सादर.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरात करावयाच्या विविध बांधकामाबाबत बांधकाम समितीची बैठक दि.१३/११/२०१४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत विषय क्र.०१ ते ०५ व आयत्यावेळेचा विषय क्र.६(१) ठेवण्यात आले असता ठरावानुसार व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस्तव शिफारस करण्यात आलेली आहे.

विद्यापीठ परिनियम S.339 (f) नुसार दि.१३/११/२०१४ रोजीचा बांधकाम समिती बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव: दि.१३/११/२०१४ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतातील विषय क्र.०१ ते ०५ व आयत्या वेळेचा विषय क्र.६(१) याबाबत बांधकाम समितीने केलेल्या शिफारशी स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. यातील बांधकामा-संदर्भातील कार्यवाही यापूर्वीच झालेली असल्याने नव्याने आलेल्या दि.२६/११/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतूदी या कामासाठी लागू करु नयेत.**

**दि.२६/११/२०१४ च्या शासन निर्णयानुसार रु.३ लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या कामाकरिता ई-निविदा मागविण्याची प्रक्रिया येथून पुढे नव्याने कराव्या लागणाऱ्या कामाकरिता लागू करण्याचे सर्वानुमते ठरले.**

**[ ०८ ] यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या दि. ३१/१०/२०१४ रोजीच्या पत्रान्वये या विद्यापीठाच्या विभागीय केंद्राच्या कार्यालयासाठी जागा देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने गेल्या २५ वर्षात ३५ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना पदवी, पदवीका, प्रमाणपत्र व पदव्युत्तर पदवी स्तरावरील व्यावसायिक/तांत्रिक शिक्षणक्रम विद्यापीठाने विकसित करुन सर्वसामान्य व्यक्तींना अत्यल्प शुल्कात शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली आहे. तसेच दर्जेदार अध्ययन-साहित्य, सवडीनुसार अभ्यास व आवडीनुसार शिक्षणक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मुक्त/दूर शिक्षण पध्दतीत विद्यार्थ्यांना दिले जात आहे. त्यामुळे सन २०११-२०१२ मध्ये UPSC व MPSC आणि इतर स्पर्धा परीक्षेत विद्यार्थी चांगल्या क्रमांकाने उत्तीर्ण होत आहेत. सन २०१३-१४ मध्ये जवळ-जवळ ६ लाख विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदविला तर यावर्षी ६ लाखाहून अधिक विद्यार्थी प्रवेश घेतील याची खात्री आहे.

विद्यापीठ शिक्षणापासून वंचित असलेल्या घटकांना उदा. नाभिक, डबेवाला, पेपर वितरण करणारा इत्यादींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना व्यवसायाला उपयोगी पडेल असे शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच उच्च शिक्षणापासून वंचित असलेल्या गरजू, जिज्ञासू व विविध कारणास्तव शिक्षण पूर्ण करु न शकलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची किंवा अपुरे राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची संधी मुक्त विद्यापीठामुळे प्राप्त झाली आहे.

परंतु, वरील सर्व बाबींचा विचार करता सोलापूर येथे सध्या कार्यरत असलेले अहिल्याबाई अध्यापक केंद्र हे वाढत्या विद्यार्थी संख्येच्या मानाने अपुरे असल्याने कामकाज करताना अनेक अडचणी निर्माण होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाच्या विभागीय केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे.

सबब, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या दि.३१/१०/२०१४ रोजीच्या पत्रान्वये या विद्यापीठाच्या विभागीय केंद्राच्या कार्यालयासाठी जागा देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या दि.३१/१०/२०१४ रोजीच्या पत्रानुसार केलेल्या विनंतीप्रमाणे त्यांच्या विभागीय केंद्राच्या कार्यालयासाठी सोलापूर विद्यापीठाच्या मालकीची जागा शासनाच्या मान्यतेनंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] श्री. चव्हाण आनंद मारुती, सिस्टिम अनॉलिस्ट व श्री. बनसोडे सुशिल श्रीनिवास, प्रोग्रामर या दोघांच्या बाबतीत शासनाकडून प्राप्त अहवाल व त्यांच्या सेवा समाप्त केल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी : प्रस्तुत विद्यापीठातील 'गट अ/ब' मधील कर्मचाऱ्यांच्या वेतन अनुदान निर्धारण संदर्भात महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. २६ ऑगस्ट, २०१४ चे पत्र दि. २३ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवले असता, त्यावर व्यवस्थापन परिषदेने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

"शासनाकडून अहवालाची प्रत मागवून घ्यावी. अ. क्र. ९ व १० बाबत कायदेशीर अभिप्राय घेवून त्यानुसार कार्यवाही करावी. यानुसार दोन्ही कृती तातडीने आणि एकाच वेळी सुरु कराव्यात त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली ".

व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांच्याकडे या कार्यायलाचे पत्र क्र. सोविसो/आस्था/ २०१४/७१२५, दि.१४ ऑक्टोबर २०१४ अन्वये अहवालाची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि.०१/११/२०१४ च्या पत्रासोबत श्री. चव्हाण आनंद मारुती व श्री. बनसोडे सुशिल श्रीनिवास या दोघांच्या संदर्भात संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रत पाठविली आहे.

त्याचप्रमाणे या कार्यालयाचे पत्र क्र. सोविसो/आस्था/२०१४/७१४२, दि.१४ ऑक्टोबर २०१४ अन्वये ॲड. संतोष शहा, कोल्हापूर यांना अभिप्राय देण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यांनी दि.२७/१०/२०१४ च्या ई-मेलव्दारे अभिप्राय व कारणे दाखवा नोटीसचा मसूदा पाठविला आहे. सदर अभिप्रायानुसार संबंधित अधिकाऱ्यांना या कार्यालयाचे पत्र दि. २८ ऑक्टोबर २०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे दि. ३/११/२०१४ रोजी प्राप्त झाले. श्री. चव्हाण आनंद मारुती व श्री. बनसोडे श्रीनिवास सुशिल यांचे दि.०३/११/२०१४ रोजीचे म्हणणे ॲड. संतोष शहा यांचेकडे पाठविण्यात आले असता, त्यांनी दि. १०/११/२०१४ रोजी त्यांचा अभिप्राय व सेवासमाप्तीच्या आदेशाचा मसूदा ई-मेलव्दारे पाठविला होता.

त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्र. SUS/Estt./२०१४/७८३४, दि. १२ नोव्हेंबर २०१४ अन्वये, श्री. चव्हाण आनंद मारुती व पत्र क्र. SUS/Estt./२०१४/७८३५, दि. १२ नोव्हेंबर २०१४ अन्वये, श्री. बनसोडे सुशिल श्रीनिवास यांना कार्यालयीन वेळेनंतर सेवामुक्त करण्यात आले आहे.

सबब, श्री. चव्हाण आनंद मारुती, सिस्टिम अनॉलिस्ट व श्री. बनसोडे सुशिल श्रीनिवास, प्रोग्रामर या दोघांच्या बाबतीत शासनाकडून प्राप्त अहवाल व त्यांच्या सेवा समाप्त केल्याची बाब माहितीस्तव.)

**ठराव: श्री. चव्हाण आनंद मारुती, सिस्टिम अनॉलिस्ट व श्री. बनसोडे सुशिल श्रीनिवास, प्रोग्रामर या दोघांच्या बाबतीत शासनाकडून प्राप्त अहवाल व विधीज्ञाकडून प्राप्त कायदेशीर सल्याप्रमाणे त्यांच्या सेवा समाप्त केल्याची नोंद घेण्यात आली.**

**[ १० ] जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत विद्यापीठास मिळालेल्या रु. २० लाख निधीतून माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रकल्प (इन्फॉर्मेशन स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम) अंतर्गत ५०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठास जिल्हा वार्षिक योजना २०१३-१४ मधून माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रकल्प राबविण्याकरिता रु.२० लाख निधी मिळालेला आहे. यामधून रु.२.५० लाख साधनसामुग्री खरेदी करण्यास व उर्वरित रु.१७.५० लाख ५०० विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाकरिता खर्च करावयाचे आहेत.

सदर निधी दि.०४/०२/२०१४ च्या पत्राने मंजुर झालेला असल्याने आणि ३१ मार्च २०१४ पूर्वी संपुर्ण पेसै खर्च करुन अहवाल देणे आवश्यक असल्याने निविदा काढण्यासाठी लागणारा २१ दिवसाचा कालावधी लक्षात घेता दि. ३०/०१/२०१४ च्या शासन परिपत्रकानुसार सात दिवसाची निविदा प्रसिध्द करण्यास दि. १३/०२/२०१४ च्या व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तथापि सदर प्रकरणी ई - टेंडर काढणे आवश्यक असल्याने आणि दरम्यानचा कालावधी लोकसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता जाहीर झाल्याने त्यावर कार्यवाही करता आली नाही.

त्याचप्रमाणे सदरची रक्कम विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर, विद्यार्थ्यांच्या सत्र परीक्षा सुरु असल्याने व दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू असल्याने ई-टेंडर प्रक्रिया पूर्ण न करता आल्याने, ५०० विद्यार्थ्यांना सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात प्रशिक्षण देता आले नाही.

त्यामुळे विद्यापीठाने जिल्हा नियोजन समिती यांना सदरची रक्कम सन २०१४-१५ मध्ये वापरण्यास परवानगी मागितली होती. जिल्हा नियोजन समितीने सदरची रक्कम खर्च करुन विनियोग प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कळविले होते.

यास अनुसरुन दि.२५/०७/२०१४ रोजी प्रथम ई-निविदा प्रकाशित करण्यात आली. यामध्ये तांत्रिकी समितीने पाचपैकी एकाच फर्मला पात्र ठरविले. त्यामुळे फेर निविदा दि.१०/०९/२०१४ रोजी प्रकाशित करण्यात आली. यानंतर एकूण पाच निविदा विद्यापीठास प्राप्त झाल्या. यामधून तांत्रिक समितीने तीन फर्मच्या निविदा पात्र ठरविल्या.

दि.११/११/२०१४ रोजी या तीन फर्मच्या कमर्शियल / फायनान्शिअल निविदा उघडण्यात आल्या. व्यवस्थापन परिषदेच्या दि.२१/०७/२०११ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र.२१ नुसार विद्यार्थ्यांना द्यावयाचे प्रशिक्षण ही सेवा असल्याने सदरचा विषय खरेदी समिती व वित्त व लेखा समितीसमोर न घेता थेट व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात येत आहे.

सबब, तुलनात्मक तक्त्यातील मे. निदीश्वरम सॉफ्ट सोल्यूशन्स, सोलापूर यांचे दर रु.९,४०,०००/- हे सर्वात कमी असल्याने सदरचे काम मे. निदीश्वरम सॉफ्ट सोल्यूशन्स, सोलापूर यांना देण्याची बाब विचारार्थ).

ठरावः **जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रकल्पासाठी (इन्फॉर्मेशन स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम) विद्यापीठास मिळालेल्या रु.२० लाख निधीतून ५०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता तुलनात्मक तक्त्यातील मे. निदीश्वरम सॉफ्ट सोल्युशन्स, सोलापूर यांचे दर रु.९,४०,०००/- हे सर्वात कमी असल्याने त्यांना प्रशिक्षणाचे काम देण्यास, प्रशिक्षणासाठी शिल्लक असलेल्या रकमेतून अधिकच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यास आणि आवश्यकतेनुसार इक्विपमेंट खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ]** **श्री. एस. एम. साळुंके, मा.राज्यपालांचे उपसचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई यांचे भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर संदर्भात प्राप्त झालेले पत्र विचारार्थ.**

(टिपणीः- मा. अध्यक्ष, भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर यांनी दि.११/०९/२०१४ रोजीचे पत्र क्र.BIGCE/EST/2014-15/144.व दि.०१/१०/२०१४ रोजीचे पत्र क्र. BIGCE/ EST/ 2014-15/188 अन्वये त्यांच्या महाविद्यालयातील केमिकल व इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग या विद्याशाखेला ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता असून विद्यापीठाची सदर अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाची फी ही प्रति विद्याशाखेस रु.२०,०००/- इतकी आहे. सदर अभ्यासक्रमाकरीता शै.वर्ष २०१३-१४ मध्ये फक्त तीन ते चार विद्यार्थी प्रवेशित असल्यामुळे शै.वर्ष २०१५-१६ करीताच्या संलग्निकरणाची फी ही प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रमाणात घेऊ न प्रस्ताव स्विकारण्यात यावे अशी विनंती विद्यापीठाकडे केलेली होती. याबाबत प्रस्तुत कार्यालयाकडून दि.२९/९/२०१४ रोजीचे पत्र क्र. सोविसो /मविविमं/ संलग्नता/६६४७ व दि.०९/१०/२०१४ रोजीचे पत्र क्र.सोविसो/मविविमं/संलग्नता/७०२३ अन्वये अध्यक्ष, भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव यांनी केलेली विनंती अमान्य करुन प्राप्त पत्र दफ्तरी दाखल करण्यात आले असल्याचे व विहीत शुल्क भरुन प्रस्ताव सादर करणेबाबत अध्यक्ष, भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव, सोलापूर यांना कळविण्यात आलेले होते.

तद्नंतर अध्यक्ष, भारतरत्न इंदिरा गाधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव यांनी दि.३०/१०/२०१४ रोजी केमिकल व इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग या दोन्ही अभ्यासक्रमाचे भाग १ व २ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण व भाग ३ च्या नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव विहीत शुल्क भरुन प्रस्ताव सादर केलेले आहेत.

सदर प्रकरणी अध्यक्ष भारतरत्न इंदिरा गाधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर यांनी दि.१३/१०/२०१४ रोजीचे पत्र क्र.BIGCE/EST/2013-14/200 अन्वये मा.कुलपती महोदय यांना उपरोक्त मुद्दयांना अनुसरुन केमिकल व इलेक्ट्रीकल इंजिनिअरींगच्या संलग्निकरणाच्या शुल्कामध्ये सवलत दयावी याबाबत विद्यापीठाकडे विनंती केलेली होती. तथापि विद्यापीठाने त्याची दखल घेतलेली नसल्याचे तक्रारीत नमुद केलेले असून केमिकल इंजिनिअरींग व इलेक्ट्रीकल इंजिनिअरींगच्या संलग्निकरणाच्या शुल्कात सवलत मिळावी अशी विनंती केलेली आहे.

अध्यक्ष भारतरत्न इंदिरा गाधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर यांनी उपरोक्तप्रमाणे मा.कुलपती यांना पाठविलेले दि.१३/१०/२०१४ रोजीचे पत्र मा.राज्यपालांचे उपसचिव, श्री एस.एम.साळुंके यांनी पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता विद्यापीठाकडे पाठवुन दिलेले आहेत.

सबब, मा.श्री. एस. एम. साळुंके, मा.राज्यपालांचे उपसचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई यांचेकडून भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर संदर्भात प्राप्त झालेले पत्र विचारार्थ).

**ठरावः** **भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर यांनी मा.कुलपतींना लिहिलेल्या दि.१३/१०/२०१४ च्या पत्रान्वये त्यांच्या महाविद्यालयातील केमिकल इंजिनिअरींग व इलेक्ट्रीकल इंजिनिअरींगच्या शुल्कात विद्यार्थी संख्येप्रमाणे सवलत मिळण्यासाठी केलेली विनंती सर्वानुमते अमान्य करण्यात येवून त्याप्रमाणे संबंधितास तसे कळविण्यात यावे असे ठरले.**

**[ १२ ] व्यवस्थापन परिषद सदस्य पदावरुन निवृत्त झाल्यानंतर संबंधित सदस्यांचा योग्य ते सन्मान चिन्ह (नावाचा व पदाचा उल्लेख करुन) देवून सन्मान करण्याबाबत व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. शिळीमकर टी. एन. यांनी दिलेले पत्र विचारार्थ.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. शिळीमकर टी. एन. यांचे दि.१८/११/२०१४ रोजीचे पत्र सोबत जोडले आहे.

व्यवस्थापन परिषद सदस्य या पदावरुन निवृत्त झाल्यानंतर संबंधित सदस्यांचा योग्य ते सन्मान चिन्ह (नावाचा व पदाचा उल्लेख करुन) देवून सन्मान करण्यात यावा अशी व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. शिळीमकर टी. एन. यांनी केलेली विनंती विचारार्थ).

**ठराव: व्यवस्थापन परिषद सदस्य व संवैधानिक अधिकारी पदावरुन निवृत्त झाल्यानंतर संबंधित सदस्यांचा योग्य तो सन्मान व्हावा या उद्देशाने त्यांचा सन्मान चिन्ह देवून उचित सत्कार करण्यात यावा आणि यासाठीच्या सन्मानचिन्हाचा नमुना तयार करुन घेण्यासाठी डॉ. शिळीमकर टी. एन. व डॉ. सूर्यवंशी एस. एस. यांची समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] अतिरिक्त विलंब शुल्काच्या दिनांकानंतर प्रति दिन, प्रति विद्यार्थी यांच्यासंदर्भात पात्रता शुल्काशिवाय आकारावी लागणारी दंडाची रक्कम ठरविण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः प्रस्तुत विद्यापीठाकडून संलग्नित महाविद्यालयातील नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज आवश्यक त्या कागदपत्रे व शुल्कासह सादर करण्यासंदर्भातील दिनांकाचे परिपत्रक अभ्यासक्रमानुसार प्रसिध्द करण्यात येतात. कळविलेल्या दिनांकाप्रमाणे पात्रता अर्ज विद्यापीठात स्विकारण्यात येतात. विद्यापीठाकडून प्रसिध्द करण्यात येणा-या परिपत्रकामध्ये नियमित शुल्क, विलंब शुल्क, विशेष विलंब शुल्क आणि त्यानंतर अतिरिक्त विलंब शुल्कासह पात्रता अर्ज विद्यापीठाकडे सादर करावयाच्या दिनांकाचा समावेश असतो. परंतु प्रत्येक वर्षी काही महाविद्यालये प्रवेशीत विद्यार्थ्यांचे परिपत्रकात नमुद केलेल्या अतिरिक्त विलंब शुल्काच्या दिनांकानंतरही पात्रता अर्ज विद्यापीठाकडे जमा करण्यासाठी येतात. अशावेळी अतिरिक्त विलंबाच्या शुल्काच्या दिनांकानंतर पात्रता शुल्काबरोबर दंडाची किती रक्कम आकारावी याबाबत अद्याप धोरणात्मक निर्णय झालेला नाही.

त्यामुळे अतिरिक्त विलंब शुल्काच्या दिनांकानंतर प्रति विद्यार्थी, प्रति दिवस किती दंडाची रक्कम आकारुन विलंबाने प्राप्त झालेले अर्ज स्विकारावे हा प्रश्न निर्माण होत आहे. आत्ता पर्यंत अशा प्रकरणी मा.कुलगुरुची मान्यता घेऊन प्रति विद्यार्थी, प्रतिदिन रु-५०/- प्रमाणे दंडाची रक्कम संबंधित महाविद्यालयाकडून आकारुन पात्रता अर्ज स्विकारण्यात येत आहेत. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८(फ) नुसार फी व इतर आकार विहित करणेचे अधिकार हे व्यवस्थापन परिषद या प्राधिकरणास आहेत.

सबब, उक्त वस्तुस्थिती विचारात घेता प्रस्तुत विद्यापीठाकडून अतिरिक्त विलंब शुल्काच्या दिनांकानंतर प्रतिदिन, प्रति विद्यार्थ्याप्रमाणे पात्रता शुल्काशिवाय दंडाची आकारावी लागणारी रक्कम ठरविण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः पात्रता आवेदन पत्र विहीत मुदतीत सादर न करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून / महाविद्यालयाकडून अतिरिक्त विलंब शुल्काच्या दिनांकानंतर प्रति दिन, प्रति विद्यार्थी रु.५०/- प्रमाणे दंड आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले शै.वर्ष २०१३-१४ पर्यंतचे स्थानिक व्यवस्थापन समितीचे अहवाल म.वि.कायदा १९९४ कलम ८५ (५) (i) अन्वये विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित वेगवेगळया महाविद्यालयांकडून स्थानिक व्यवस्थापन समितीचे अहवाल (Local Management Committee Report) प्राप्त झालेले आहेत.

**स्थानिक व्यवस्थापन समिती अहवाल प्राप्त महाविद्यालये**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | शै.वर्ष | अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | शै.वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर. | २०१३-१४ | २ | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर | २०१३-१४ |
| ३ | डी. जी. बी. दयानंद लॉ कॉलेज, सोलापूर. | २०१३-१४ | ४ | डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर | २०१३-१४ |
| ५ | डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर. | २०१३-१४ | ६ | डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर. | २०१३-१४ |
| ७ | वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर | २०१३-१४ | ८ | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर | २०१३-१४ |
| ९ | वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर | २०१२-१३<br>२०१३-१४ | १० | हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर. | २०१२-१३<br>२०१३-१४ |
| ११ | श्री.वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर. | २०१२-१३<br>२०१३-१४ | १२ | युनियन एज्युकेशन सोसायटीचे, महिला महाविद्यालय, सोलापूर. | २०१३-१४ |
| १३ | एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव. | २०१३-१४ | १४ | सिंहगड बिझनेस स्कूल, केगांव. | २०१३-१४ |
| १५ | कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सोलापूर. | २०१३-१४ | १६ | भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर. | २०१३-१४ |
| १७ | सिंहगड स्कूल ऑफ कॉम्प्युटर स्टडीज, केगांव. | २०१३-१४ | १८ | नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर, | २०१३-१४ |
| १९ | ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बेलाटी. | २०१३-१४ | २० | ए. जी. पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोरेगांव. | २०१३-१४ |
| २१ | व्ही.व्ही.पी. इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोरेगांव. | २०१३-१४ | २२ | संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप. | २०१३-१४ |
| २३ | सुशीलकुमार शिंदे शारिरीक शिक्षण महाविद्यालय, सोलापूर. | २००९-१०<br>२०१०-११<br>२०११-१२<br>२०१२-१३<br>२०१३-१४ | २४ | कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर. | २०१३-१४ |
| २५ | गांधीनाथा रंगजी बीसीए महाविद्यालय, सोलापूर. | २०१२-१३<br>२०१३-१४ | २६ | शरदचंद्र पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर. | २०१३-१४ |
| २७ | भारत रत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर . | २०१३-१४ | २८ | सोलापूर सोशल असोसिएशनचे, आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर. | २०१३-१४ |
| २९ | संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर. | २०१३-१४ | ३० | देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी कॉलेज, सोलापूर. | २०१३-१४ |
| ३१ | व्ही. जी. शिवदारे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कॉलेज ऑफ फॉर्मसी कॅम्पस, जुळे सोलापूर १, | २०१२-१३<br>२०१३-१४ | ३२ | सोलापूर सोशल असोसिएशनचे, कॉलेज ऑफ एज्युकेशन, सि.स.क्र. १०६५९, सिध्देश्वर पेठ, सोलापूर. | २०१२-१३<br>२०१३-१४ |
| ३३ | छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, मुरारजी पेठ, सोलापूर. | २०११-१२<br>२०१२-१३<br>२०१३-१४ | ३४ | माऊली महाविद्यालय, वडाळा. | २०१३-१४ |
| ३५ | लोकमंगल बायो-टेक्नॉलॉजी कॉलेज, वडाळा. | २०१३-१४ | ३६ | माऊली शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वडाळा. | २०१३-१४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | बी.बी.ए.ॲन्ड बी.सी.ए.महाविद्यालय, अक्कलकोट. | २०१३-१४ | ३८ | मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अक्कलकोट. | २०१३-१४ |
| ३९ | सी.बी.खेडगीज बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स ॲन्ड राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट. | २०१३-१४ | ४० | मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेटी कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अक्कलकोट. | २०१३-१४ |
| ४१ | के.एन.भिसे आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, कुर्डूवाडी. | २०१३-१४ | ४२ | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, माढा.<br>माढा-शेटफळ रोड, माढा. | २०१२-१३<br>२०१३-१४ |
| ४३ | बबनरावजी शिंदे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मोडनिंब. | २०१२-१३<br>२०१३-१४ | ४४ | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, माढा. | २०१३-१४ |
| ४५ | पार्वती ताड शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मंगळवेढा. | २०१२-१३<br>२०१३-१४ | ४६ | मदनसिंह मोहिते पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा. | २०१३-१४ |
| ४७ | देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ. | २०१३-१४ | ४८ | मा. बाबुराव पाटील कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, अनगर. | २०१३-१४ |
| ४९ | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा. | २०१३-१४ | ५० | भारत महाविद्यालय, जेऊर (म.रेल्वे) | २०१२-१३<br>२०१३-१४ |
| ५१ | डॉ.पी.डी.पाटील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज, झरे. | २०१३-१४ | ५२ | प्रतापसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, करमाळा. | २०११-१२<br>२०१२-१३<br>२०१३-१४ |
| ५३ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर. | २०१३-१४ | ५४ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस, कोर्टी. | २०१३-१४ |
| ५५ | कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालय, पंढरपूर. | २०१३-१४ | ५६ | बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे. | २००८-०९<br>२००९-१०<br>२०१०-११<br>२०११-१२<br>२०१२-१३<br>२०१३-१४ |
| ५७ | न्यु सातारा कॉलेज ऑफ बी.सी.ए. पंढरपूर. | २०१३-१४ | ५८ | उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर. | २०१३-१४ |
| ५९ | श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयुटचे, कॉलेज ऑफ फॉर्मसी, गोपाळपूर. | २०१२-१३<br>२०१३-१४ | ६० | कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, गोपाळपूर, पंढरपूर. | २०१२-१३<br>२०१३-१४ |
| ६१ | श्री.विठ्ठल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वेणुनगर (गुरसाळे). | २०१३-१४ | ६२ | इन्स्टिटयुट ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज, कासेगाव. | २०१३-१४ |
| ६३ | उमा महाविद्यालय, पंढरपूर. | २०१३-१४ | ६४ | राजाराम भोसले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, करोळे. | २०१३-१४ |
| ६५ | कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे. | २०१३-१४ | ६६ | एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी. | २०१३-१४ |
| ६७ | विज्ञान महाविद्यालय, सांगोला. | २०१३-१४ | ६८ | सांगोला कॉलेज, सांगोला. | २०१३-१४ |
| ६९ | सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर. (M.B.A.) | २०१३-१४ | ७० | सहयाद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे. | २०१२-१३<br>२०१३-१४ |
| ७१ | श्रीमती. काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन, कमलापूर. | २०१३-१४ | ७२ | सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर. (M.C.A.) | २०१३-१४ |
| ७३ | कै. आमदार काकासाहेब साळुंखे -पाटील आर्टस ॲन्ड सायन्स कॉलेज, जवळे. | २००४-०५<br>ते<br>२०१३-१४ | ७४ | माणदेश महाविद्यालय, जुनोनी. | २०१३-१४ |
| ७५ | शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज. | २०१२-१३<br>२०१३-१४ | ७६ | महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सांगोला. | २०१२-१३ |
| ७७ | समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस. | २०१३-१४ | ७८ | महात्मा फुले कॉलेज ऑफ एज्युकेशन, अकलूज. | २०१३-१४ |
| ७९ | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अकलूज. | २०१३-१४ | ८० | सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, शंकरनगर, अकलूज. | २०१३-१४ |
| ८१ | अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर. | २०१२-१३<br>२०१३-१४ | ८२ | ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर, अकलूज. | २०१२-१३<br>२०१३-१४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८३ | विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते. | २०१२-१३<br>२०१३-१४ | ८४ | श्रीराम इन्स्टिटयुट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी , पानीव. | २०१३-१४ |
| ८५ | बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी. | २०१३-१४ | ८६ | राजसिंह मोहिते पाटील इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, शंकरनगर | २०१२-१३<br>२०१३-१४ |
| ८७ | आर्टस अॅन्ड कॉमर्स कॉलेज, माढा. | २०१२-१३<br>२०१३-१४ | ८८ | कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी. | २०१३-१४ |
| ८९ | श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, झ ाडबुके मार्ग, बार्शी. | २०१३-१४ | ९० | कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, वैराग. | २०१३-१४ |
| ९१ | राजर्षि शाहू लॉ कॉलेज, बार्शी. ता.बार्शी. | २०१३-१४ | ९२ | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी. ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४११ | २०१३-१४ |
| ९३ | हेमुजी चंदेले महाविद्यालय, शेळगाव(आर). | २०१३-१४ | ९४ | सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग. | २०१३-१४ |
| ९५ | जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग. | २०१३-१४ | ९६ | जय जगदंबा एम.एड. महाविद्यालय, वैराग. | २०१३-१४ |
| ९७ | विठ्ठलराव शिंदे आर्टस कॉलेज, टेंभूर्णी. | २०१३-१४ | | | |

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८५ (५) (i) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे :

**Prepare the annual report on the work done by committee for the year ending on the 30 the June and submit the same to the management, The Management Council of the university and to the concerned Director**

उपरोक्त तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले व्यवस्थापन समितीचे अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव:** **संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या शै.वर्ष २०१३-१४ पर्यंतच्या स्थानिक व्यवस्थापन समितीच्या अहवालास महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ८५(५)(i) अन्वये सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्याच प्रमाणे जी महाविद्यालये चालू स्थितीत आहेत परंतु त्यांनी अहवाल पाठविला नाही, अशा महाविद्यालयांना स्थानिक व्यवस्थापन समितीचे अहवाल पाठविण्याबाबत स्मरणपत्रं पाठवावीत, असे सर्वानुमते ठरले.**

**[ १५ ] सन २०१५ मध्ये घेण्यात येणाऱ्या निवडणूका निर्विवादपणे पार पाडण्याकरीता एका मानसेवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत व त्यांचे मानधन ठरविण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ४७ नुसार दि.३१ ऑगस्ट, २०१५ रोजी विविध अधिकार मंडळाचा कालावधी संपणार आहे. साधारणता जानेवारी, २०१५ पासून निवडणूकीचे काम सुरु करण्यात येणार आहे.

प्रस्तुत विद्यापीठासाठी सन २०१० या वर्षात पहिल्यांदाच निवडणूका घेण्यात आल्या. निवडणूक प्रक्रिया निर्विवादपणे व व्यवस्थितपणे पार पाडणे अत्यंत गरजेचे असल्याने निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजामध्ये निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती असलेली व निवडणूक प्रक्रियेचे कामकाज केलेली व्यक्ती म्हणून श्री. वसंतराव मगदूम यांची मानसेवी अधिकारी पदावर दरमहा रु.१५,०००/- मानधनावर नियुक्ती करण्यास व्यवस्थापन परिषदेने दि.२१/११/२००९ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्र.१९ नुसार मान्यता दिली होती.

त्यानुसार, सन २०१० मध्ये श्री. वसंतराव मगदूम यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर विद्यापीठाने सर्वप्रथम डिसेंबर २०१० पूर्वी निवडणूक प्रक्रिया निर्विवादपणे व व्यवस्थितपणे पूर्ण केली. ही बाब लक्षात घेता, सन २०१५ मध्ये होणाऱ्या विविध अधिकारमंडळाच्या निवडणूकीचा विचार करता, श्री. वसंतराव मगदूम यांना मानसेवी अधिकारी म्हणून निवडणूकीचे कामकाज पूर्ण होईपर्यंत नियुक्त करण्याची व सदरच्या कामाचे स्वरुप लक्षात घेता, मानधन ठरविण्याची बाब विचारार्थ).

ठरावः **सन २०१५ मध्ये घेण्यात येणाऱ्या निवडणूका निर्विवादपणे पार पाडण्याकरीता कुलसचिव तथा निवडणूक अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी मागील निवडणूकीत कार्य केलेले श्री. वसंतराव मगदूम किंवा तत्सम योग्य, सक्षम आणि अनुभवी अधिकाऱ्यांची मानसेवी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यास व त्यांना प्रति महिना रु.२५,०००/- मानधन आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः**

**[१६(१) ] संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे वरिष्ठश्रेणीत केंद्रीय पध्दतीने स्थाननिश्चिती प्रस्तावाचे शुल्क सुधारित करणेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी :सोबत जोडलेला प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांचे वरिष्ठश्रेणीत केंद्रीय पध्दतीने स्थाननिश्चिती करणेबाबतचा विहित नमून्यातील प्रस्ताव आवलोकनार्थ.

याबाबत सादर करण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांचे केंद्रीय पध्दतीने स्थाननिश्चिती करणेबाबतच्या प्रस्तावाचे सद्यास्थितीत शुल्क रु.३००/- असून, त्यामध्येच स्थाननिश्चिती समिती सदस्यांचा प्रवास खर्च व दैनंदिन खर्च व इतर बैठकीचा खर्च समावेश आहे. सदर प्रस्तावाचे शुल्क हे प्रस्तुत विद्यापीठ स्थापनेपूर्वी (२००४ पूर्वी) शिवाजी विद्यापीठाने रु.३००/- ठरविलेले असून, ते शुल्क प्रस्तुत विद्यापीठाने आजतागायत कायम ठेवलेले आहे.

सबब, सदर प्रस्तावाच्या शुल्कामध्ये कालानुरुप दर ५ वर्षानी वाढ होणे गरजेचे असल्यामुळे सदर प्रस्तावाचे शुल्क रु.३००/- ऐवजी रु.१०००/- शुल्क (स्थाननिश्चिती समिती सदस्यांचा प्रवास खर्च, दैनंदिन भत्ता व इतर खर्च) आकारण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे वरिष्ठश्रेणीतील स्थाननिश्चिती प्रस्तावाचे शुल्क रु.३००/- ऐवजी रु.१,०००/- याप्रमाणे सुधारित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६(२) ] सोलापूर विद्यापीठात एम. ए. भाग- १ व २ कन्नड या विषयात एकुण गुणात सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस (मुलीत प्रथम) सुवर्णपदक देणकरिता श्री. भीमराय कल्लप्पा रवि यांनी दिलेली १,००,०००/- (एक लक्ष) ची देणगी स्विकारणेबाबत.**

(टिपणी: श्री. भीमराय कल्लप्पा रवि, ९४, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर यांनी त्यांच्या पत्रात सोलापूर विद्यापीठात एम. ए. भाग-१ व २ कन्नड या विषयात विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थीनीमध्ये एकुण गुणात सर्व प्रथम क्रमांकाने येणा-या स्नातकास सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्णपदक **"दिवंगत मातोश्री काशीबाई कल्लप्पा रवि सुवर्णपदक "** या नावाने विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभावेळी स्नातकास प्रदान करण्यात यावे, याकरिता श्री. भीमराय कल्लप्पा रवि यांनी रु.१,००,०००/(अक्षरी रु. एक लक्ष) देणगी दाखल देवू इच्छितात. सदरच्या रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील सुवर्णपदक देण्यात यावे. तथापि, दहावा दीक्षांत समारंभात सदरचे सुवर्णपदक देण्याकरिता आवश्यक तो खर्च श्री. भीमराय कल्लप्पा रवि यांनी स्वत: करण्यास तयार आहेत.

उक्त प्रमाणे देणगी स्विकारुन **"दिवंगत मातोश्री काशीबाई कल्लप्पा रवि सुवर्णपदक"** चालू करण्याची बाब विचारार्थ.

सदर सुवर्णपदकांसाठी नियमावली तयार करण्याकरिता समिती गठीत करणे आवश्यक असल्याने समिती सदस्यांच्या नामनिर्देशास्तव.

श्री. भीमराय कल्लप्पा रवि यांनी देवू केलेली देणगी स्विकारण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ज) नुसार मान्यतेस्तव तथा नियमावली तयार करण्यासाठी समिती सदस्यांच्या नामनिर्देशनार्थ विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठामध्ये एम. ए. भाग- १ व २ कन्नड या विषयात गुणानुक्रमे सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस सुवर्णपदक देणकरिता श्री. भीमराय कल्लप्पा रवि यांनी दिलेली रु.१,००,०००/- (एक लक्ष) देणगी स्विकारुन हे सुवर्णपदक आगामी दीक्षांत समारंभापासून देण्यास मान्यता देण्यात आली.**

**त्याच प्रमाणे प्रत्येक सुवर्णपदकांची स्वतंत्र नियमावली तयार करण्यापेक्षा सर्वच सुवर्णपदकासाठी एकच सर्वंकष नियमावली असावी असे सर्वानुमते ठरले व अशी नियमावली तयार करण्याकरिता ॲड. श्री. सलगर बी. एस., डॉ. सुर्यवंशी एस. एस. व श्री. पाटील बी. पी. परीक्षा नियंत्रक यांची समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[१६(३)] सोलापूर विद्यापीठामध्ये बी.ए. भाग-१, २ व ३ उर्दू या विषयात एकुण गुणात सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास "प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेला नियमावलीचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१८/१०/२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी, खैरदी निवास, १०/३ विद्यानगर उत्तर सदर बझार, सोलापूर यांच्याकडून देणगी रक्कम रु.१,००,०००/- विद्यापीठास प्राप्त झाली आहे. त्यानुसार ०३ नोव्हेबर, २०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.०५ नुसार सुवर्णपदकांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर देणगीच्या व्याजातून सोलापूर विद्यापीठात बी.ए. भाग-१, २ व ३ उर्दू या विषयात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने येणा$या स्नातकास **"प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी सुवर्णपदक"**या नावाने पुरस्कार देण्याकरिता नियमावलीचा मसूदा १) श्री. पवार एस. के. व प्रा. डॉ. सुर्यवंशी एस. एस. या समितीने तयार करुन दिलेला आहे.

सबब, शै. वर्ष २०१४-१५ पासून सोलापूर विद्यापीठामध्ये बी. ए. भाग-१, २ व ३ उर्दू या विषयात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने येणाऱ्या स्नातकास **"प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी सुवर्णपदक"**या नावाने पुरस्कार देण्याकरिता तयार करण्यात आलेला नियमावलीचा मसूदा विचारार्थ).

**ठरावः सोलापूर विद्यापीठामध्ये बी.ए. भाग-१, २ व ३ उर्दू या विषयात एकुण गुणात सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास "प्रा. मोहम्मद हनीफ इस्माईल खैरदी सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीच्या मसूद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६(४) ] शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ चा मराठी व इंग्रजी भाषेतील वार्षिक अहवाल पुस्तक व सी. डी. स्वरुपात तयार करुन घेणेची बाब विचारार्थ.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम, १०४ या तरतुदीनूसार विद्यापीठाचा वार्षिक अहवाल तयार करणे आवश्यक आहे. शासनाचे पत्र क्रं. विवाअ २०१३ / प्रक्र.६/विशि-३ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ नुसार वार्षिक अहवालाच्य सी.डी. स्वरुपातील (Soft Copy) ७०० प्रती तसेच मराठी व इंग्रजीच्या पुस्तक रुपाने प्रत्येकी २०० प्रती व मराठी- इंग्रजी एकत्रित असल्यास प्रत्येकी २०० प्रती विधानमंडळ सचिवालयाला पाठविण्यासाठी शासनास पाठविणे आवश्यक आहे.

त्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा मराठी वार्षिक अहवाल पुस्तक स्वरुपात ५०० प्रति त्याचप्रमाणे इंग्रजी वार्षिक अहवाल पुस्तक स्वरुपात २५० प्रति व मराठी आणि इंग्रजी वार्षिक अहवालाच्या एकत्रित ८०० सी. डी. तयार करण्यासाठी दिनांक २९/१०/२०१४ रोजी दैनिक संचार या वृत्तपत्रामधून जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार अंतिम दि.२१/११/२०१४ पर्यंत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त झालेल्या ३ निविदा दिनांक २७/११/२०१४ रोजी उघडण्यात आल्या असून त्यापैंकी पात्र ठरलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडण्यात आला आहे.

प्राप्त निविदेचा तुलनात्मक तक्ता विचारात घेता मे. मल्टीकलर ऑफसेट, सोलापूर यांनी मराठी पुस्तक स्वरुपातील अहवालाच्या ५०० प्रतीचे प्रति नग रु.२०२/- प्रमाणे (एकूण अहवालाचे अंदाजे पाने पाटपोट ५२०) व इंग्रजी पुस्तक स्वरुपातील २५० प्रतिचे प्रती नग रु.३०१/-प्रमाणे (एकूण अहवालाचे अंदाजे पाने पाटपोट ५२०) आणि मराठी व इंग्रजी वार्षिक अहवालाच्या एकूण ८०० सी.डी. प्रती नग रु.१७/- प्रमाणे सर्व मिळवून अंदाजे रक्कम रु.१,८९,८५० /- (सर्व करासह) छपाई करुन विद्यापीठास पोहोच देण्याचे मान्य केले आहे.

सबब शैक्षणिक वर्ष २०१३-१४ चा वार्षिक अहवाल पुस्तक स्वरुपात व सी.डी. स्वरुपात मे. मल्टीकलर ऑफसेट, सोलापूर यांच्याकडून मराठी अहवालाचे ५०० प्रतीचे, प्रती नग रु.२०२/- प्रमाणे व इंग्रजी अहवालाचे २५० प्रतीचे प्रती नग रु.३०१/- या दराने पुस्तक स्वरुपात छपाई करणे व दोन्ही भाषेतील वार्षिक अहवालाच्या ८०० सी.डी. प्रती नग रु.१७ प्रमाणे तयार करुन घेण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ चा मराठी व इंग्रजी भाषेतील वार्षिक अहवाल पुस्तक व सी. डी. स्वरुपात मे. मल्टीकलर ऑफसेट, सोलापूर यांच्याकडून तयार करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यासाठी मराठी अहवालाच्या ५०० प्रती, प्रति नग रु.२०२/- प्रमाणे व इंग्रजी अहवालाच्या २५० प्रती प्रति नग रु.३०१/- या दराने पुस्तक स्वरुपात छपाई करणे व दोन्ही भाषेतील वार्षिक अहवालाच्या ८०० सी.डी. प्रति नग रु.१७/- या दरास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[१६(५)] आर्कि. यादगिरी कोंडा यांचे न्यायालयीन प्रकरण तडजोडीने निकाली काढण्याबाबत.**

(टिपणी: दि.२९/०४/२०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठात करावयाच्या विविध बांधकामासाठी वास्तुविशारदांचे नामनिर्देशन करण्यात आले होते. त्यानुषंगाने इतर कामाबरोबरच मेस क्र. १ चा पहिला मजला, मेस क्र. २ चा पहिला मजला, उपकरण कक्ष इमारतीचा पहिला मजला, कॅन्टीन येथे पेव्हींग ब्लॉकचे काम करणे ही कामे आर्कि. कंची यांना तर गेस्ट हाऊस एक्स्टेंशनचे काम आर्कि. खमितकर यांना देण्यात आलेली होती. सदर दोन्ही वास्तुविशारदांनी दि.२७/०६/२०१४ व दि.०८/०७/२०१४ अन्वये विद्यापीठास पत्र लिहून सदर प्रकरणी पूर्वीचे आर्कि. श्री. यादगिरी कोंडा यांनी Council of Architecture कडे तक्रार केलेली असून त्यानुषंगाने कागदपत्रे दाखल केली तरीदेखील Council ने सदर प्रकरण Disciplinary Committee कडे पाठविले असल्याने, सदर प्रकरणी आर्कि. यादगिरी कोंडा यांचे नाहरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय ही कामे करण्यास असमर्थता दर्शविली.

विद्यापीठाच्या विकासाची सर्वच कामे थांबली असल्याने मा.कुलगुरुंनी आर्कि. कोंडा यांचे प्रकरण तडजोडीने निकाली काढण्याच्या दृष्टीने या प्रकरणी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य श्री. एस. सी. धुत्तरगाव यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची समिती गठीत केली. सदर समितीने आर्कि. कोंडा यांनी या विद्यापीठात केलेल्या विविध कामांचा विचार करुन त्यांना रु.६०,६१,५६७/- इतकी वास्तुविशारद फी म्हणून देणे योग्य राहील अशी शिफारस केलेली आहे. यापैकी रु.०६,७३,५०७/- इतकी सर्व्हिस टॅक्सची रक्कम असून जर विद्यापीठास सर्व्हिस टॅक्स लागू होत नसल्यास रु.५३,८८,०६०/- इतकी रक्कम आर्कि. कोंडा यांना वास्तुविशारद फीपोटी देण्याची शिफारस केली आहे.

वरील प्रकरणी निर्णय घेण्यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विद्यापीठास प्राप्त झालेल्या नॉन १२ ब वन टाईम कॅच अप ग्रँट अंतर्गत मंजूर झालेल्या रु.१० कोटीच्या रकमेच्या उपयोगितेची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. नॉन १२ ब वन टाईम कॅच अप ग्रँट अंतर्गत विद्यापीठास रु.१० कोटीचे अनुदान प्राप्त झाले. त्यापैकी १) ॲकॅडेमिक इमारत बांधकाम करणे - टेक्नॉलॉजी संकूल साठी रु. २ कोटी, २) परीक्षा भवन व मुख्य प्रशासकीय इमारत बांधकाम करणे साठी रु.२ कोटी, ३) फॅकल्टी क्लब / जिम्नॅशिअम बांधणे साठी रु.९१ लाख, ४) अतिथीगृह वाढीव बांधकाम करणे साठी रु.१.५५ कोटी, ५) आरोग्य केंद्र इमारत बांधकाम करणे साठी रु.३२ लाख, ६) जमिनीखालील पाण्याची टाकी बांधणे साठी रु.१.६२ कोटी, ७) सुरक्षा भिंतीचे वाढीव बांधकाम करणे साठी रु.१.६० कोटी मंजूर असून त्यातील केवळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाला सुरुवात झालेली आहे. उर्वरित रक्कम शिल्लक आहे. या

संपूर्ण रकमेचा खर्च हा ३१ मार्च पूर्वी करुन उपयोगिता अहवाल सादर करणे आवश्यक आहे. मात्र अद्याप वर नमूद केलेले पाणीपुरवठा योजनेचे काम वगळता एकही काम सुरु झालेले नाही. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाचे दि.२७/१०/२०१४ चे पत्र अवलोकनी घेणे आवश्यक आहे. सदर पत्रान्वये विद्यापीठाने मंजूर केलेला निधी वेळेत वापरला नाही त्यामुळे विद्यापीठास नॉन १२ ब वन टाईम कॅच अप ग्रँट अंतर्गत मंजूर झालेल्या रु.१० कोटीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या हिश्याच्या रु.५ कोटीपैकी त्यांनी दिलेले रु.२.५० कोटीचे अनुदान १०% व्याजासह परत मागितले आहे. जर हे अनुदान विद्यापीठ अनुदान आयोगास परत करावे लागले तर शासनाच्या हिश्याच्या रु.५ कोटीमधून त्यांच्या हिश्याचे रु.२.५० कोटीपैकी प्राप्त झालेले रु.१.०४ कोटी देखील परत द्यावे लागणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेल्या वन टाईम कॅच अप ग्रँट पैकी वर नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या रकमेतून विद्यापीठास जमिनीखालील टाकी बांधणे व पाणीपुरवठा योजनेसाठी रु.१.०७ कोटी खर्च करण्यात आलेले आहेत. त्यातच गेस्ट हाऊसचे एक्स्टेंशनसाठी रु.१.५५ लाख मंजूर आहेत. सदर प्रकरणी आर्कि. यादगिरी कोंडा यांच्याकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळाल्यास गेस्ट हाऊसच्या कामास सुरुवात करता येईल.

आर्कि. कोंडा यांचे प्रकरण तडजोडीने मिटवल्यास, वरीलप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त झालेल्या रकमेतून गेस्ट हाऊस एक्स्टेंशनसाठी रु.१.५५ कोटी व पाणीपुरवठा योजनेसाठीचे रु.१.०७ कोटी इतकी रक्कम खर्च झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करुन रु.२.५ कोटी परत न मागण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगास विनंती करुन प्रयत्न करता येतील.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, आर्कि. कोंडा यांचे न्यायालयीन प्रकरण तडजोडीने निकाली काढण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **आर्कि. यादगिरी कोंडा यांची न्यायालयीन प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी अभ्यास करुन शिफारस करण्याकरिता नियुक्त समितीच्या शिफारशीप्रमाणे आर्कि. कोंडा यांना देय असलेली रक्कम रु.६०,६१,५६७/- (विद्यापीठास सर्व्हिस टॅक्स लागू होत नसल्यास रु.५३,८८,०६०/-) इतकी रक्कम आदा करण्यास सर्वानुमते मान्यता दिली. त्याचप्रमाणे माळढोक आरक्षणाकडून सूट मिळाली नाही तर ४८२ एकरमध्ये मास्टरप्लॅन नुसार मान्य केलेल्या जागेत आरोग्य केंद्र व फॅकल्टी क्लब बांधण्याऐवजी सायन्स सेंटर शेजारी असलेल्या आणि माळढोकचे आरक्षण नसलेल्या १० एकर जागेत आरोग्य केंद्र व फॅकल्टी क्लब बांधण्यासाठी मास्टरप्लॅनमध्ये दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६(६) ] सोलापूर विद्यापीठास पात्र ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:प्रस्तुत विद्यापीठास खाजगी ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याकरिता दि.२१/०८/२०१४ रोजी दै. लोकमत या वर्तमानपत्रात, विद्यापीठाच्या (http://su.digitaluniversity.ac) व शासनाच्या (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. या जाहिरातीस अनुसरुन एकूण ०८ ठेकेदार/पुरवठादारांनी ई-निविदा भरले होते. सदर ०८ ठेकेदार / पुरवठादारांचे ई-निविदा मधील तांत्रिकीबाबीची निविदा दि.१८/११/२०१४ रोजी समिती समोर उघडण्यात आली असून, त्यामध्ये मे.प्रायमा ग्रुप, सोलापूर यांनी तांत्रिकी निविदासोबत सेल्फ अटेस्टेड वर्कडन लिस्ट जोडली नसल्याने व व्यवस्थापन परिषदेने दि.२४/१२/२००८ रोजीच्या बैठकीत "मे.प्राईमा ग्रुप, सोलापूर यांना येथून पुढे कोणत्याही प्रकारचे कंत्राट देवू नये असे ठरले". असा निर्णय घेतला असल्याने, त्यांची तांत्रिक निविदा अपात्र ठरविले आहे. (सोबत तुलनात्मक तक्ता जोडला आहे.)

उर्वरित निविदाधारकांचे तांत्रिक निविदा पात्र ठरल्यामुळे त्यांची दराची निविदा उघडण्याची समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार आर्थिक दरांची निविदा दिनांक २४/११/२०१४ रोजी दुपारी ०३:०० वा. समिती समोर उघडण्यात आली.

उघडण्यात आलेल्या दराच्या निविदेमध्ये मे. विशाल ऐक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे यांनी २.३५% दर नमूद केलेला आहे व इतर संस्थानी सादर केलेले दर हे रुपयामध्ये असल्याने मे.विशाल ऐक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे यांच्याकडून सेवा शुल्क ११ महिन्यासाठी किंवा करार संपेपर्यंत लागू राहील. त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या दरात बदल झाल्यास त्यांच्या सेवा शुल्कामध्ये वाढ होणार नाही. अशा आशयाचे पत्र संबंधिताना दि.२८/११/२०१४ रोजी ई-मेलद्वारे पाठविले असता, त्यांनी त्यांचे म्हणणे (हमीपत्र) दि.२८/११/२०१४ रोजी ई-मेलद्वारे विद्यापीठास पाठविले आहे. (सोबत हमीपत्र जोडला आहे.)

मे.विशाल ऐक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे यांच्याकडून हमी प्राप्त झाल्यामुळे इतर आर्थिक दरांच्या पूरवठादारांचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता, त्यामध्ये सर्वात कमी सेवा शुल्क मे.विशाल ऐक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे यांचे असल्याने समितीने मा.सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर यांच्या दि.२७/११/२०१४ च्या पत्रानुसार मे.विशाल ऐक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे यांच्याकडून मनुष्यबळ पुरविण्याची सेवा घेण्याबाबत शिफारस केली आहे. (सोबत तुलनात्मक तक्ता व सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर यांचे पत्र जोडले आहे.)

सबब, मे. विशाल ऐक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे यांचेशी सोबतच्या तुलनात्मक तक्त्याप्रमाणे रु.६.९७ (सं.लेखनिक, डाटा ऑपरेटर, प्रयोगशाळा सहायक व वाहनचालक) व रु.६.२४ (प्रयोगशाळा परिचर, शिपाई व माळी) प्रती कर्मचारी प्रती दिन याप्रमाणे ११ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा करार संपपेर्यंत आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरविण्यासंदर्भात करार करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठास पात्र ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याबाबत मे. विशाल एक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे यांच्याशी तुलनात्मक तक्त्याप्रमाणे रु.६.९७/- (सं.लेखनिक, डाटा ऑपरेटर, प्रयोगशाळा सहायक व वाहनचालक) व रु.६.२४/- (प्रयोगशाळा परिचर, शिपाई व माळी) प्रति कर्मचारी प्रति दिन याप्रमाणे ११ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा करार संपपेर्यंत आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरविण्यासंदर्भात करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६(७) ] दि.२८/११/२०१४ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) नुसार वित्त व लेखा समितीच्या वतीने मा.कुलगुरु यांनी केलेली मान्यतेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

(टिपणी: दि.२८/११/२०१४ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार खरेदी समितीने कार्यवृत्तांतास मान्यता दिलेली आहे. कार्यवृत्तांतातील विषय क्र.२, ३ व ४.१ बाबत तातडीने कार्यवाही करावयाची असल्याने त्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करुन वित्त व लेखा समितीच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, दि.२८/११/२०१४ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **दि.२८/११/२०१४ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांतातील विषय क्र.२, ३, ४.१ बाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) नुसार वित्त व लेखा समितीच्या वतीने मा.कुलगुरु यांनी केलेली मान्यतेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६(८) ] मे. आयडियल एंटरप्रायझेस, होटगी रोड, सोलापूर या खाजगी कंत्राटदारास मनुष्यबळ पुरविण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी मुनष्यबळ पुरविण्याकरिता नोंदणीकृत ठेकेदारांकडून / पुरवठादारांकडून दि.१६/०९/२०१४ पर्यंत ई-निविदा सादर करणेबाबत दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात, विद्यापीठाच्या (http://su.digitaluniversity.ac) व शासनाच्या (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०८ ई-निविदा प्राप्त झाले होते. त्यापैकी ०७ निविदाधारकांचे आर्थिक दर निविदा समिती समोर उघडण्यात आले आहे. त्यामध्ये मे. विशाल ऐक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे हे सर्वात कमीत कमी सेवा शुल्क आकारले असल्याने त्यांच्याशी मनुष्यबळ पुरविण्यासंदर्भात करार करण्याकरिता काही दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे मे. आयडियल एंटरप्रायझेस, होटगी रोड, सोलापूर या खाजगी कंत्राटदारास एक महिन्याची मुदतवाढ देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

ठरावः **मे. विशाल एक्सपर्ट सर्व्हिसेस, पुणे यांच्यासमवेत करावयाच्या मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या करारास लागणारा कालावधी लक्षात घेता, मे. आयडियल एंटरप्रायझेस, होटगी रोड, सोलापूर या खाजगी कंत्राटदारास मनुष्यबळ पुरविण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**